कला अकादमी गोवा

# संगीत नाटक महोत्सव

नियमावली

# कला अकादमी गोवा
## संगीत नाटक महोत्सव
### नियमावली

कला अकादमी गोवा दरवर्षी आयोजित करीत असलेल्या संगीत नाटक महोत्सवात सहभागी होऊ इच्छिणा-या संस्थांना खालील नियम व अटी पूर्ण कराव्या लागतील :-

१. ज्या संस्थांची १८६० च्या संस्था नोंदणी कायद्यानुसार अधिकृत नोंदणी झालेली आहे व नियमानुसार नोंदणी/नुतनीकरण करण्याची प्रक्रिया वेळोवेळी पूर्ण केलेली आहे अशा संस्थांनाच या महोत्सवात भाग घेता येईल. प्रवेशिका सादर करतेवेळी संबंधित संस्थांनी सक्षम प्राधिकारीणीने दिलेल्या प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत सादर करणे आवश्यक आहे.

**२. सदर महोत्सवात एकूण नऊ (९) नाटकांची निवड केली जाईल परंतू त्यासाठी कुठलीही विभागणी किंवा वर्गवारीचे बंधन असणार नाही. त्यामुळे संस्थांनी सादर केलेल्या प्रवेशिकांतून सर्व नाटकांची तालीम पाहून जी गुणवत्तेनुसार चांगली व दर्जेदार नाटके असतील तीच खास नेमलेल्या निरीक्षकांकडून निवडली जातील. महिला कलाकारांचाही त्यात एकत्रितपणे विचार केला जाईल.**

३. गावा गावात फिरुन प्रत्येक संस्थेची स्वतंत्र तालीम पहाण्यापेक्षा सर्व संस्थांना एक किंवा आवश्यक त्या ठिकाणी आमंत्रित करुन त्यांची एकत्र तालीम निरीक्षक मंडळाकरवी पहाण्यात येईल त्यासाठी कला अकादमी कृष्णकक्ष/रविंद्र भवने/राजीव गांधी कलामंदिर किंवा तत्सम जागांची निवड करण्यात येईल. तालमीसाठी प्रत्येक संस्थेला येण्या जाण्याचा एका वाहनाचा प्रवास खर्च अकादमीच्या नियमाप्रमाणे व निर्धारीत केलेल्या प्रति कि.मी. दरानुसार देण्यात येईल.

४. **सदर महोत्सव हा केवळ गोमंतकीय संस्था व कलाकारांसाठीच असल्यामुळे गोव्याबाहेरील संस्थांना व कलाकारांना त्यात सहभागी होता येणार नाही**. कुठल्याही सहभागी संस्थेतर्फे अशा संबंधीची लेखी तक्रार केल्यास संबंधित कलाकारांचे सक्षम प्राधिकारीणीने दिलेले अधिकृत ओळखपत्र अथवा तत्सम/समकक्ष दस्तावेजाची प्रत संस्थाप्रमुखाला अकादमीच्या मागणीनुसार सादर करावे लागेल. या नियमाचे उल्लंघन झाल्याचे सिध्द झाल्यास संबंधित संस्थेवर योग्य ती कारवाई केली जाईल.

५. महोत्सवात भाग घेणा-या संस्थाना अकादमीने निश्चित केलेल्या निकषानुसार कोणत्याही एकाच संगीत नाटकाचा प्रयोग महोत्सवात सादर करता येईल.

६. महोत्सवात सहभागी होणा-या संस्थेला आपल्या प्रवेशिकेसोबत रोख रु. १,०००/- (रुपये एक हजार मात्र) अनामत रक्कम भरावी लागेल. महोत्सवात निवड झालेल्या व न झालेल्या सर्वांना ही रक्कम परत मिळेल. परंतु सहभागी संस्थांचा एकदा तालमीचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर एखाद्या संस्थेने आपली प्रवेशिका मागे घेतल्यास तसेच प्रयोग ऐनवेळी रद्द केल्यास ही रक्कम परत केली जाणार नाही. त्याचप्रमाणे प्रयोग सादर करतेवेळी कला अकादमीच्या मालमत्तेची संबंधित संस्थेकडून कोणतीही नुकसानी झाल्यास त्याची भरपाई वरील रकमेतून करुन घेऊन उर्वरित रक्कम परत करण्यात येईल. तसेच संस्थेकडून झालेली नुकसानी अनामत रकमेपेक्षा जास्त असल्यास ती त्वरीत अकादमीकडे भरण्याची जबाबदारी पूर्णताः संबंधित संसथेवर राहील.

७. अंतिम महोत्सवात सादर केल्या जाणा-या नाटकांचे मूल्यमापन कला अकादमी नियुक्त निरीक्षकामार्फत करण्यात येईल.

८. अंतिम महोत्सवातील निवड झालेल्या संस्थेला नाट्यप्रयोग महोत्सवात सादर करण्यासाठी कला अकादमीकडून रु.३०,०००/-(रुपये तीस हजार) अनुदान देण्यात येईल. मात्र **' प्रॉम्प्टींग '** हा प्रकार सादरीकरणावेळी अजिबात खपवून घेतला जाणार नाही व असा प्रकार घडल्यास व निरिक्षकांच्या अहवालात ही बाब नमूद झाल्यास सदर नाटयसंस्थेच्या अनुदानात १०,०००/- रुपयांची कपात करण्यात येईल.

९. नाट्यप्रयोगाच्या सादरीकरणाच्या दिवशी संबंधित संस्थेला एकुण अनुदानातील रु.२०,०००/- ची रक्कम, धनादेश अथवा तत्सम स्वरुपात देण्यात येईल व उर्वरीत रु.१०,०००/-ची रक्कम मूल्यमापन समितीचा अहवाल आल्यानंतर संबंधित संस्थेच्या देण्यात येईल.

१०. अंतिम महोत्सवातील प्रत्येक नाटयप्रयोगासाठी रु.५०/-च्या प्रवेशिका आकारण्यात येतील. या तिकिट विक्रीतून आलेल्या एकूण रकमेच्या ८० टक्के रक्कम संबंधित संस्थेला देण्यात येईल व २० टक्के रक्कम कला अकादमीकडे राहील. तिकिट विक्रीची व्यवस्था कला अकादमी करील. परंतु जास्तीत जास्त तिकिट विक्री होण्याच्या दृष्टीने संबंधित संस्थेला आपल्या नाटयप्रयोगाच्या किमान आठ दिवस अगोदर कला अकादमीकडून अधिकाधिक ५० टक्के तिकिटे मिळवून परस्पर विक्री करता येईल. मात्र तिकिट विक्रीचा संपूर्ण हिशेब, (विकलेल्या तिकिटांचा काउंटर फॉयलसह) विक्रीतून आलेली संपूर्ण रक्कम व न विकलेली तिकिटे प्रयोगाच्या दिवशी सायं.४.०० वाजेपर्यंत कला अकादमीच्या कार्यालयात अधिकृतपणे जमा करणे आवश्यक आहे.

**११. कला अकादमीतर्फे प्राथमिक स्तरावर नाटकांची निवड करण्यात येईल त्यासाठी संपूर्ण नाटक नाटयगीतांच्या उत्स्फूर्त ताना-आलापींसह पूर्ण बसविणे अत्यंत आवश्यक आहे. तालमीच्यावेळी निरीक्षकांच्या सूचनेनुसार नाटकातील कुठलाही प्रवेश सादर करावा लागेल. तालमीच्यावेळी प्रत्यक्ष संगीतसाथीची व्यवस्था (ऑर्गन व तबला) असणे गरजेचे असून तालमीसाठी सहभागी होणा-या संगीत साथीदारांनाच अंतिम महोत्सवात सदर संस्थेतर्फे सहभागी व्हावे लागेल.**

१२. कुठल्याही संस्थेला आपले कलाकार ऐनवेळी बदलता येणार नाहीत त्याचप्रमाणे कोणत्याही कलाकाराला एकापेक्षा अनेक नाटकात सहभागी होता येणार नाही. तालमीसाठीही हा नियम लागू होईल. तालमीसाठी दिलेल्या कलाकारांच्या यादीतील कलाकारच संबंधित संस्थेला अंतिम महोत्सवासाठी घ्यावे लागतील.

१३. महोत्सवात सहभागी होणयासाठी इच्छुक संस्थाना अकादमीच्या विहीत नमुन्यातील प्रवेशअर्ज, अनामत रकमेसह निर्धारीत मुदतीतच कला अकादमी कार्यालयात पोचती करणे आवश्यक आहे. कलाकारांची सविस्तर माहिती असलेल्या चार प्रती तालमीच्यावेळी अकादमीच्या प्रतिनीधिकडे द्याव्या लागतील तसेच संहितेची एक प्रत त्याच वेळी निरिक्षकांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे.

१४. तालमी पाहून निरीक्षकानी केलेली नाटकांची निवड ही सर्वावर संपूर्णपणे बंधनकारक राहील. त्या संदर्भात कुठल्याही संस्थेच्या पदाधिका-याना किंवा

कलाकारांना मतप्रदर्शन करता येणार नाही. तसेच या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१५. अकादमीकडे आलेल्या प्रवेशिकांमधून नाटकांची निवड कला अकादमीतर्फे केल्यानंतर निवड झालेल्या सदर संस्थेस अकादमीने निश्चित केलेल्या अंतिम महोत्सवाच्या कार्यक्रमानुसार नियोजित स्थळी आपले नाटक सादर करणे बंधनकारक आहे.

१६. महोत्सवात सादर केल्या जाणा-या कुठल्याही नाटकाच्या सादरीकरणाचा अवधी १५ मिनीटांच्या मध्यंतरासह कमीत कमी अडीच तास व जास्तीत जास्त तीन तासापेक्षा जास्त असता कामा नये. सर्व संस्थांनी वेळेचे हे बंधन काटेकोरपणे पाळणे गरजेचे आहे.

१७. एखाद्या संस्थेने महोत्सवात अगोदर सादर केलेले तेच नाटक पुन्हा त्याच संस्थेला सादर करता येणार नाही. अथवा त्याच कलाकारांना घेऊन दुस-या एखाद्या संस्थेचा नावाखालीही सादर करता येणार नाही.

१८. **एकाच लेखकाच्या त्याच नाटकाच्या एक किंवा अनेक संस्थांकडून प्रवेशिका आल्यास त्यातील सर्वोत्कृष्ठ अशा एकाच नाटकाची निवड निरीक्षकांमार्फत केली जाईल.**

१९. नाटकासाठी संगीत दिग्दर्शक, ऑर्गनवादक आणि तबलावादक (संगीतसाथ करणारे कलाकार)यांना एकापेक्षा अनेक नाटकांसाठी संगीत दिग्दर्शन/संगीतसाथ करता येईल.

२०. कोणत्याही दिग्दर्शकाला एकापेक्षा अनेक नाटकात सहभागी होता येणार नाही. मात्र इतर तंत्रज्ञ (बॅकस्टेज आर्टिस्ट)यांना या नियमात सूट राहील.

२१. ही स्पर्धा नसून हा महोत्सव असल्यामुळे तसेच निवडलेल्या संस्थांना स्वतंत्र अनुदान देण्यात येत असल्यामुळे कुठलीही वैयक्तिक पारितोषिके दिली जाणार नाहीत.

२२.अंतिम महोत्सवात निवड झालेल्या संस्थांना प्रयोग सादर करण्यासाठी अकादमीच्यावतीने रंगमंच, प्रकाशयोजना, ध्वनियंत्रणा यांची सोय खालीलप्रमाणे करण्यात येईल :-

१. मुख्य व मागील पडदा तसेच उपलब्ध असलेले जंगल, बाग व महाल या दृश्याचे पडदे
२. उपलब्ध तरफा (प्लेन विंग्स)
३. पाच जनरल लाईटस्
४. दहा पारलाईटस्
५. एक हजार वॅटस् क्षमतेचे २० स्पॉटलाईटस्
६. सायक्लोराम आणि दोन सोलर
७. आठ ध्वनिक्षेपक व उपलब्ध असलेले लेपल माईक्स् आवश्यकतेनुसार
८. उपलब्ध असलेले जास्तीत जास्त सोळा फ्लॅटफॉर्मस्

**संस्थांनी आपल्या वरील तांत्रिक सोई व सुविधांसाठी प्रयोगाच्या किमान आठ दिवस अगोदर लेखी स्वरुपात अकादमीला कळवाव्यात.**

**वरील सुविधा सदर महोत्सव कला अकादमीच्या दिनानाथ मंगेशकर कला मंदिरात आयोजित केल्यास उपलब्ध असतील परंतू महोत्सव अन्य कुठल्याही सभागृहात आयोजित केला गेल्यास त्याठिकाणच्या सुविधा उपलब्धतेनुसार संस्थाना मिळतील. उपलब्ध साधनसुविधांच्या अतिरीक्त गरजेसाठी संबंधित संस्थेला बाहेरुन स्वखर्चाने साधनसामुग्री उपलब्ध करावी लागेल.**

२३. अंतिम महोत्सवातील नाटयप्रयोग संपल्यानंतर दोन तासांच्या आत संपूर्ण रंगमंच रिकामा करुन देण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. त्यानंतर राहिलेल्या कोणत्याही सामानाची जबाबदारी अकादमीवर राहणार नाही.

२४. महोत्सवात भाग घेणा-या संस्थेला सादर करावयाच्या नाटकाचे स्वरुप, विशेषत: ते नाटक स्वतंत्र आहे किंवा भाषांतरीत आहे किंवा दुस-या नाटकाचे रुपांतर आहे हे, मूळ लेखक, भाषा यांचा निर्देश करुन प्रवेशिका सादर करतेवेळी कळवावे लागेल. महोत्सवात नाटक, कथा, कादंबरी इत्यादि अन्य वाड्.मय प्रकारांवर आधारित असेल तर तसाही उल्लेख करावा लागेल.

२५. लेखकास मानधन देण्याची व महोत्सवातील प्रयोगासाठी त्याची परवानगी मिळविण्याची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील. या संदर्भात कोणत्याही स्वरुपाचा गैरप्रकार घडल्याचे त्याची संपूर्ण जबाबदारी सदर संस्थेवर राहील. तसेच अशा स्वरुपाचा गैर प्रकार घडल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास संबंधित प्रयोग रद्द करण्याचा अधिकार अकादमीने राखून ठेवला आहे. शिवाय संस्थेला/नटसंचाला पुढील एका वर्षातील अकादमीच्या सर्व महोत्सव तसेच स्पर्धातून बाद ठरविण्यात येईल.

२६. महोत्सवातील संपूर्ण नाटकाचे चित्रीकरण करण्यासाठी संस्थेच्या लेटरहेडवर नाटकाचे लेखक, दिग्दर्शक, यांची लेखी परवानगी जोडून एका दूरचित्रवाणी कॅमे-याने चित्रीकरण करण्यास परवानगी देण्यात येईल. चित्रीकरण करणा-या तंत्रज्ञांचे(कॅमेरामन)छायाचित्र आणि नाव, वय, पत्ता, अनुभव इ.तपशीलवार माहिती देऊन अकादमीची आगाऊ लेखी संमती घ्यावी लागेल. अकादमीच्या लेखी परवानगीनंतरच चित्रीकरण करता येईल. सदर चित्रीकरण करताना नाटयगृहातील प्रेक्षक, निरीक्षक, आयोजक याना कोणत्याही प्रकारचा व्यत्यय/गैरसोय होणार नाही याची संपूर्ण दक्षता कॅमेरामन आणि संस्थेला घ्यावी लागेल. अकादमीला आवश्यक वाटल्यास कोणत्याही क्षणी चित्रीकरण बंद करण्याचा अधिकार अकादमीकडे राहील.

२७. संगीत रंगभूमीचा दर्जेदारपणा महोत्सवातील नाटयप्रयोगाना अपेक्षित असल्याने संगीत रंगभूमीवरील ज्येष्ठ अनुभवी कलाकारांचे मार्गदर्शन महोत्सवात सहभागी होणा-या संस्थानी घ्यावे अशी कला अकादमीची अपेक्षा आहे.

२८. कला अकादमी ही संघटनात्मक व व्यवस्थापकीय स्वरुपाची संस्था असल्यामुळे तसेच महोत्सवातील नाटकांची निवड स्वतंत्र निरीक्षकमंडळाकडून होत असल्यामुळे अकादमीत काम करणा-या व्यक्तींना किंवा त्यांच्या संबंधित संस्थांना सदर महोत्सवात भाग घेण्यास मोकळीक राहील

२९. तालमीची प्रक्रिया सुरु असताना किंवा अंतिम महोत्सवात नाटयप्रयोग सादर होत असताना एखाद्या संस्थेशी संबंधित कोणत्याही व्यक्तीने प्रयोग सादर करताना कोणत्याही स्वरुपाचा अडथळा हेतूपुरस्परपणे आणण्याचा प्रयत्न केल्याचे अकादमीच्या निदर्शनास आल्यास सदर संस्थेला/नटसंचाला/तंत्रज्ञांना अकादमीच्या महोत्सवातून तसेच इतर स्पर्धातून भाग घेण्यास पुढील तीन वर्षांकरीता अपात्र ठरविण्यात येईल.

३०. नाटयप्रयोग सादर करणा-या संस्थेस कला अकादमीच्या आवश्यकतेनुसार कलामहोत्सव अथवा इतर कार्यक्रमानिमित्त सदर नाटक सादर करावे लागेल.यासाठी कला अकादमीने निश्चित केलेले मानधन देण्यात येईल.

३१. उशिरा आलेल्या/अपूर्ण प्रवेशिका ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

३२. वरील नियमाबद्दल कोणतीही शंका निर्माण झाल्यास कला अकादमीच्या अध्यक्षांचा त्यासंबंधीचा निर्णय अंतिम व सर्वांना बंधनकारक राहील.

३३. वरील नियमात आवश्यक वाटल्यास कोणत्याही क्षणी व महोत्सवाच्या कोणत्याही टप्प्यावर फेरफार करण्याचा संपूर्ण अधिकार कला अकादमीने राखून ठेवला आहे. असा फेरफार केल्यास तो महोत्सवात सहभागी होणाऱ्या सर्व संस्थांवर बंधनकारक राहील.

***

# कला अकादमी गोवा
## संगीत नाटक महोत्सव

### ***नाटकासंबंधी माहिती***

संस्थेचे नाव :-----------------------------------------------------------------

संगीत नाटक :-----------------------------------------------------------------

लेखक :-----------------------------------------------------------------

नाटक रुपांतरीत असल्यास, मूळ नाटक ::--------------------------------

भाषाः--------------------------मुळ लेखकः-------------------------

दिग्दर्शक :-----------------------------------------------------------------

संगीत दिग्दर्शक :-----------------------------------------------------------

हार्मोनियम/ऑर्गनसाथ :--------------------------------------------------

तबलासाथ :-----------------------------------------------------------------

प्रकाशयोजना :-------------------------------------------------------------

नेपथ्य :-----------------------------------------------------------------

वेशभूषा :-----------------------------------------------------------------

रंगभूषा :-----------------------------------------------------------------

| भूमिका | कलावंत |
| --- | --- |
| १)--------------------- | --------------------------- |
| २)-------------------- | --------------------------- |
| ३)------------------- | --------------------------- |
| ४)------------------- | --------------------------- |
| ५)------------------- | --------------------------- |
| ६)------------------- | --------------------------- |
| ७)---------------- | ----------------------------- |
| ८)------------------- | --------------------------- |
| ९)------------------- | --------------------------- |
| १०)------------------ | --------------------------- |

टीप:-जागा पुरत नसल्यास स्वतंत्र कागद जोडावा.

नाटयप्रयोगासाठी लागणारा एकूण वेळ--------मिनिटे अंक:एक/दोन/तीन. मध्यंतरासाठी लागणारा वेळ------मिनिटे.

महोत्सवाच्या नियमाना अनुसरुन वर नमूद करण्यात आलेली सर्व माहिती खरी आहे.

तारीख :

-------------------

स्वाक्षरी

संस्थेचा शिक्का

अध्यक्ष/सचिव

नाव:-------------------------

**(वरील तपशिलाच्या चार प्रती व संहीतेची एक प्रत सर्व संस्थानी तालमीच्या वेळी कला अकादमीच्या प्रतिनिधीकडे आगाऊ देणे.)**

# कला अकादमी गोवा
## संगीत नाटक महोत्सव
### प्रवेश अर्ज

प्रति
सदस्य सचिव
कला अकादमी गोवा
पणजी-गोवा ४०३००१

महोदय,

✻ कला अकादमी गोवा आयोजित संगीत नाटक महोत्सवात आम्ही भाग घेऊ इच्छितो.

संस्थेचे नाव :-----------------------------------------------

संपूर्ण पत्ता :------------------------------------------------

------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक: १) अध्यक्ष :-----------------२) सचिव:--------------

✻ संस्था रजिस्ट्रेशन क्रमांक व तारीख अथवा नूतनीकरणाची तारीख ------------
(सोबत छायांकित प्रत जोडावी.)

✻ महोत्सवात सादर होणारे संगीत नाटक :------------------------------

✻ नाटक रुपांतरीत असल्यास, मूळ नाटक : ---------------भाषा--------

मुळ लेखक:----------------

✻ सदर नाटक यापूर्वीच्या संगीत नाटक महोत्सवात सादर झाले आहे काय १ होय/नाही.

✻ अनामत रक्कम रु.१०००/-
पावती क्रमांक :--------------------------- दिनांक :------------

**मी याद्वारे जाहीर करीत आहे की, सदर महोत्सवाचे संपूर्ण नियम व अटी आम्ही अवगत करुन घेतल्या असून त्यांचे व अकादमीकडून वेळोवेळी केल्या जाणा-या सुचनांचे संपूर्ण पालन करण्याची हमी या प्रवेश अर्जाद्वारे देत आहे.**

तारीख :-

-------------------------
स्वाक्षरी
अध्यक्ष/सचिव

संस्थेचा शिक्का

नाव:---------------------------

**(सदर प्रवेशिका निर्धारित मुदतीत अनामत रकमेसह कला अकादमी कार्यालयात पोचती करणे आवश्यक आहे)**